# इतिहासाचे पुनर्लेखन

प्रा.डॉ.फुलचंद सुर्यभान दुधभाते
जवाहर महाविद्यालय, अणदूर,
ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

प्रस्तावना : .

आतापर्यंत इतिहासाचे झालेले लिखाण हे बहुतेक सर्व ठिकाणी कागदपत्राची, संदर्भ साधनाचा वापर करून इतिहास लेखन झालेले दिसून येत नाही.तसेच संशोधन हे चिरकाल टिकणारे असत नाही. काळाच्या ओघात त्यामध्ये बदल अपेक्षित असतो. बदल व सुधारणा हा सर्व जगाचा नियम आहे, त्यामुळे इतिहासामध्ये ही बदल करणे आवश्यक ठरते, इतिहास हा विषय पण शास्त्र ठरू शकतो. परंतू त्याप्रमाणे पुरावे देणे आवश्यक ठरते. एखाद्या ऐतिहासिक घटनेच्या संदर्भात नव्याने पुरावा उपलब्ध झालयास त्याचा स्विकार करून त्या घटनेचा नव्याने लेखन करणे गरजेचे ठरते. जेणे करून वाचक वर्गाला सत्य माहिती देता येईल. रियासतकार सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे इतिहास म्हणजे “मानवी प्रगतीचा आढावा” हे तत्व सिध्द करण्यासाठी नव्या काठाच्या संदर्भात इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक ठरते.[१]

उदिष्टये :—

इतिहासाचे पुनर्लेखन बदलत्या काळानुसार करणे गरजेचे ठरते. कारण बदलत्या काळानुसार अनेक नवीन संदर्भ उपलब्ध होतात त्याचा स्विकार करून इतिहास लेखनात बदल करणे गरजेचे ठरते.

तसेच इतिहासाचा संबंध भूतकाळाशी असतो. भूतकाळ हा लिखीत व अलिखीत संदर्भ साधनामध्ये बंदिस्त असतो. इतिहास लेखन हा प्रामुख्याने पुराव्यावर आधारित असतो. त्यामुळे प्रा.लॉजीलॉस व सेनबॉस यांनी म्हटल्याप्रमाणे ष्छव क्वबनउमदजे छव भ्पेजवतलष् या उक्तीबदल कोणताही संशय असल्याचे कारण नाही. ब—याचवेळा काही अनपेक्षित घटनामुळे काही संदर्भ साधने उपलब्ध होत असतात.[२]

वरील लॉजीलॉस यांच्या विचारावरून आपल्या लक्षात येईल की, पुरावा नाही तर इतिहास नाही. म्हणजेच इतिहास लेखनात साधनाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. साधने ही इतिहासाची आत्मा असतात. इतिहास लेखनामध्ये नवनव्याने साधनाची भर पडत आहे. एखाद्या घराण्याविषयी माहिती देणारे कांही पुरावे नव्याने उपलब्ध झाल्यास त्या पुराव्याच्या आधारे इतिहासाचे पुनर्लेखन करणे कमप्राप्त ठते. नव्याने उपलब्ध होणारी संदर्भ साधने ही इतिहास लेखनासाठी वरदान ठरतात.

ब—याचावेळा जून्या संदर्भ साधनामध्ये नव्याने भर पडत असते. ब—याच वेळा असे जुन्या कालखंडावर माहिती देणारे साधने असतानाही नव्याने भ पडत असते. त्यामुळे इतिहास लेखनामध्ये भर पडते. नवीन सारांश अर्थ समजण्यास मदत होते. ब—याच वेळी अनेक घटनाबद्यल समज—गैरसमज निर्माण होतात. ते दूर होण्यास नवीन साधने मदत करतात.

थोडक्यात इतिहास लेखनात नव्याने साधने भर टाकतात.त्याचा स्विकार करून संशोधकाने इतिहासाचे पुनर्लेखन करण्यास हरकत नाही. इतिहासाचे लेखन करत असताना इतिहासकारावर ज्या विचाराचा प्रभाव पडलेला असेल त्या अनुषंगाने तो लिखान करीत असतो. त्याना नंतर नवीन पुरावे, संदर्भ साधने उपलब्ध झाल्यास त्याचा स्विकार करून इतिहासाचे पुनर्लेखन करणे गरजेचे ठरते. इतिहासकार ज्या विचार सरणीमध्ये वाढलेला असेल त्याचा प्रभाव त्याच्यावर पडतो. पुन्हा त्या विचारसरणीचा प्रभाव लेखनावर पडत असतो. अशा वेळी त्या संशोधकाने नव्या संदर्भ साधनाचा स्विकार करून इतिहासाचे पुनर्लेखन केल्यास वास्तव समाजासमोर मांडण्यास समर्थ ठरू शकतो. शेवटी इतिहाकाराची दृष्टी कशी आहे. यावर इतिहास लेखन अवलंबून असते. एखाद्य इतिहासकाराचे लक्ष महसूल विभागाकडे असेल तर तो युध्दविषयक माहिती देण्याकडे थोडासा दुर्लक्ष करतो. म्हणजेच असे म्हणता येईल की, संशोधकाची दृष्टी कशावर पडते कशी पडते यावर त्याचे यश, अपयश अवलंबून असते. म्हणजेच एकच घटना असते. त्या घटनेकडे पाहण्याचा प्रत्येक संशोधकाचा दृष्टीकोन वेगवेगळा असू शकतो.

इतिहासलेखनामध्ये वस्तूनिष्ठता येण्यासाठी इतिहासकार प्रयत्न करीत असतो. परंतू अनेक अडचणीमुळे तो वस्तूनिष्ठ लिखन करू शकत नाही. तरी परंतू नव्याने उपलब्ध होणारी साधने, नवीन विचार प्रवाह याचा संशोधकाने स्विकार करून त्याचा लेखनाचे पुनर्लेखन करणे गरजेचे ठरत आहे. जेणे करून त्यामुळे वाचक



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

वर्गाला वास्तव इतिहास सांगू शकू. तसेच मिळालेली संदर्भ साधने, त्या साधनाची सत्यता पडताळूनच त्याचा स्विकार करणे गरजेचे आहे. इतिहासाचा अन्वयार्थ लावत असताना शास्त्रशुध्द पध्दतीने लावणे गरजेचे आहे.

इतिहास हा विषय वाट चुकलेल्याना वाट दाखवीत असतो. ज्या देशाला वैभवशाली इतिहास नाही त्या देशांची अवस्था वाट चुकलेल्या माणसाची अवस्था कशी होते तशीच अवस्था त्या देशाची होते. त्यामुळे खरा इतिहास समाजासमोर मांडला तर खरी माहिती मिळू शकते.म्हणून आपल्या पुर्वजांच्या जगण्यातून काही तत्वे घेता येईल त्यामुळे खरा इतिहास लिहिणे इतिहासकाराचे आद्य कर्तव्य बनते. त्यामुळे संशोधकानी नव्या संदर्भ साधनाचा वापर करून, बदलत्या काळानुसार नवीन अन्वयार्थ लावून इतिहासाचे पुनर्लेखन केल्यास वास्तव इतिहास लेखन होईल.

संदर्भ :.

१.इतिहासलेखनशास्त्र सरदेसाई डॉ.गायकवाड /हनमाने पृ.क्रं.१८२ फडके प्रकाशन कोल्हापूर – १९९६
२.इतिहासलेखनशास्त्र – सरदेसाई डॉ.गायकवाड, हनमाने पृ.क्र.१८२ फडके प्रकाशन कोल्हापूर १९९६.
३. बेंद्रे वा.सी.साधन चिकीत्सा पृ. १९६
४.इतिहासाचे तत्वज्ञान – सदाशिव आठवले
५.संशोधन पध्दती, प्रक्रिया, अंतरंग. डॉ.दु.का.संत
६.पुराणकथा आणि वास्तवता – डी.डी.कोसबी
७.ग.ह.खरे.– साधनचिकीत्सा
८.ई.एच.कार.– इतिहास म्हणजे काय?.
९.डॉ.प्रभाकर गाद्रे – इतिहास लेखनाच्या परंपरा
१०.डॉ.गोविंद चंद्र पांडे. इतिहास.– स्वरूप एवम् सिध्दांत
११.दे.वि.केतकर – इतिहासातील अंत:प्रवाह
१२.ढवळीकर म.के. – पुरातत्वविद्या पा.१ ते ३
१३. देव, शां.भा – पुरातत्वविद्या पा.१

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

# अजिंठा लेणी एक वैशिष्टयपूर्ण शिल्प

प्रा.डॉ.फुलचंद सुर्यभान दुधभाते
जवाहर महाविद्यालय, अणदूर
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

अजिंठा या डोंगराचे प्राचीन नाव मंदागिरी असे होते. लेणी क्रमांक १७ मधील शिलालेखात तेथील चैत्य 'अचिंत' या नावाच्या मंत्र्याने कोरल्याचा उल्लेख आहे. अचिंत या ठिकाणी भद्रबंधु, धर्मदत हे बौध्द पंडित राहत होते. १८१९ मध्ये इंग्रज अधिका-यांनी प्रथम अजिंठा लेणीचा शोध लावला. अजिंठा येथे असलेल्या लेण्यापैकी ९,१०,१९,२६ आणि २९ या लेण्या (हीनयान) आणि इतर पंचवीस विहार (महायान) आहेत. अजिंठा येथे हीनयान व महायान या दोन्ही पंथाच्या लेण्या कोरलेल्या आहेत.

अजिंठा येथील लेणीच्या कोरीव कामाचे दोन वेगवेगळे टप्पे असलेले दिसून येतात. गौतम बुध्दाच्या प्रतिकांची पूजा करणा-या हीनयान आणि बुध्द मूर्तीच पूजा करणा-या महायान पंथीयाच्या येथे गुंफा पहावयास मिळतात. खालीलपैकी गुंफा या फार जून्या आहेत. गुफा क्रमांक ८.९.१०.१२.१३.१५ इत्यादी. वरील सर्व गुफा सातवाहन काळात कोरल्या गेल्या आहेत.

**उद्दिष्टये :-** अजिंठा लेणीतील मूर्ती शिल्पाची माहिती जाणून घेणे

अजिंठा येथील लेणीच्या खोदकाम सर्वप्रथम सातवाहन राजाने केले त्यानंतर गुप्त, वाकाटक आणि वडामीच्या चालुक्य राजानीही केले आहे. अजिंठा येथील लेणीचे निर्मितीच्या कालखंड साधारणतः इसवीसनाचे दुसरे शतक ते सातवे शतक हा आहे.

**अजिंठा लेणी माहिती**

**लेणी क्रमांक -१ :-** ही लेणी चैत्य व विहार अशा स्वरूपाची वास्तू आहे. या लेणीत एकुण वीस स्तंभ आहेत. त्या प्रत्येक स्तंभावर नक्षीकाम करण्यात आलेले आहे. या स्तंभावर गौतम बुध्दाच्या जीवनातील अनेक प्रसंग कोरण्यात आले आहेत. समोरच्या बाजुस . दोन छोटया खोल्या आहेत. मध्ये जाण्यासाठी तीन दरवाजे आहेत. सर्व स्तंभ कोरीव आहेत. आतमध्ये गौतम बुध्दाची मोठया आकाराची मूर्ती आहे. ही लेणी कधी कोरण्यात आली याचा उल्लेख सापडत नाही.

**लेणी क्रं. २**

ही लेणी म्हणजेच विहार आहे. ही लेणी आकाराने लहान आहे. समोर एक दालन आहे. त्याच्या समोर एक खोली आहे. खोल्या समोरील स्तंभावर अवलंबून मंडप आहे. मुख्य जो प्रवेशद्वार आहे. त्या प्रवेशद्वारावर चांगल्या पध्दतीचे कोरीव शिल्प आहे. लेणीच्या पाठी मागे भिंतीमध्ये गर्भगृह आहे. त्यात भगवान गौतम बुध्दाची मूर्ती कोरण्यात आली आहे. ही मूर्ती आकर्षक,सुबक कोरण्यात आली आहे.

**लेणी क्रमांक -४** हे पण अजिंठा येथील एक विहार आहे. याचे ही काम अर्धवट झालेले दिसून येते. येथे बुध्दाच्या मूर्त्या कोरण्यात आल्या आहेत. तसेच येथेच बाजूला बोधीसत्वाची जटा मुकूटाच्या रूपात ध्यान अवस्थेत धर्म चक्र प्रवर्तन अवस्थेत गौतम बुध्दाची मूर्ती कोरण्यात आली आहे. तसेच गर्भगृहात गौतम बुध्दांची एक मूर्ती कोरण्यात आली आहे. ही लेणी साधारणतः इसवीसनाच्या सहाव्या शतकाच्या पूर्वार्धात कोरण्यात आली असावे. या लेणीचे काम अर्धवटच झाले आहे.

**लेणी क्रं.५** हे एक विहार असून याचे ही काम अर्धवट झाले आहे.

**लेणी क्रमांक -६** हे दोन मजली विहार असून तळमजल्याचे पटांगण नष्ट झालेले आहे. येथे प्रवेशद्वाराजवळ एक हौद आहे. मंडपात स्तंभ आहेत. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पाय-या कोरण्यात आल्या आहेत. येथे ही गौतम बुध्दाच्या प्रतिमा आहेत. येथील दरवाजावर सुंदर असे नक्षीकाम केलेले दिसून येते.

**लेणी क्रं.७ -** ही लेणी इतर लेण्या पेक्षा वेगळी आहे. या विहारात मंडपाच्या ठिकाणी दोन्ही शिरावर दोन लहान लहान मंडप आहेत. येथेच दोन अष्टकोनी स्तंभ आहेत. तसेच अर्धकमल व पशुंचे शिर कोरण्यात आलेले आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

अजिंठा लेणीतील लेणी क्रमांक १० ही सर्वात जूनी आहे. या लेणीमध्ये सातवाहन राजा कटहाडी याने दिलेल्या दानाचा उल्लेख येथे आहे. तसेच लेणी क्रमांक ९ व १० चैत्यगृह आहेत. हीनयान पंथाच्या काळात बांधलेले चैत्यगृह आहेत.

अजिंठा येथील चित्राचं वैशिष्टये म्हणजे कुठेही दारिद्रय, दुःख, दैन्य किंवा किळसवाणी प्रसंग दिसून येणार नाही. येथे श्रीमंती, विलास, सौंदर्य, माधुर्य, करूणा भक्ती यांचेच दर्शन घडते. त्यामुळे हे चित्र जनमाणसाची कला असावी. अजिंठा येथील चित्रात व्यापारी, सरदार, राजे, राण्या, श्रीमंत लोक, वीर पुरूष, दास दासी , नोकर, संत. धुर्त माणस, गरीब लोक, भिकारी असे सर्वजणच येथे दिसून येतात. अजिंठा येथील चित्रामध्ये प्रेम तिरस्कार, सुख, दुःख विजयाचा उन्माद, दीर्घायुष्य, मृत्यू, अशा वेगवेगळया भावभावनाचे चित्रण, मोठमोठे राजवाडे, दरबार, खेडी, मोठमोठे गावे तसेच आश्रम अशा विविधतेचे दर्शन येथे घडते. तसेच गोतम बुध्दाच्या जीवनातील विविध प्रसंग कोरण्यात आले आहेत. तसेच लेणी क्रमांक १७ मधील प्रसंग राहुल यशोधराकडे भिक्षा मागण्यासाठी भगवान गौतमबुध्द जातात. येथे राहूल, यशोधरापेक्षा , गौतम बुध्दाची प्रतिमा मोठी दाखवण्यात आली आहे.

गौतमबुध्दाच्या गतजन्माच्या कांही कहाण्या येथे चित्राद्वारे दाखवण्यात आल्या आहेत. वज्रपाणी आणि पद्मपाणि बोधीसत्व जगप्रसिध्द आहेत.

अजिंठा येथील चित्राच वैशिष्टय म्हणजे समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्था दाखवण्यासाठी वेगवेगळया रंगाचा वापर केलेला दिसून येतो. राजघराण्यातील व्यक्ती, मंत्री, ब्राम्हण यांना दाखवण्यासाठी तांबूस रंगाचा वापर करण्यात आला आहे. सर्व सामान्य माणसासाठी काळसर रंग वापरण्यात आला आहे. येथील चित्रामध्ये गंधर्व, यक्ष व अप्सरा याही देवता दाखवण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी फुलाची नक्षी काम करण्यात आले आहे.

निर्जीव दगडावर दोन हजार वर्षापूर्वी अज्ञात कलाकारांनी आपली कला पणाला लावून त्यामध्ये आपली मेहनत लावून येथील चित्रे रेखाटली आहेत. अजिंठा येथील चित्र काढत असताना तत्कालीन समाजाचं प्रतिबिंब चित्र रूपाने दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ :**

१) मराठवाडयाचे कलावैभव -प्रा.म.श्री.माटे
२) पुरातत्व विद्या - डॉ.शां.भा.देव
३) मराठवाडा काल आणि आज - संपा-प्रा.भगवान काळे
४) यादवकालीन महाराष्ट्र - मुरलीधर गजानन पानसे
५) सातवाहन कालीन महाराष्ट्र- डॉ. रा.श्री.मोरवंचीकर

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad